(8)

कायम विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान/तत्वावर~~

34402/80
शाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/२६ 325
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 19 DEC 2003

प्रति

१. ~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद,~~

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड.

विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणे. (माध्यम इंग्रजी )

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/ १००३/ (२०० / २००३)/प्राशि-२, दिनांक २४/६/२००३

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००३ —— पासून इ. १ ली च्या वर्गास —— फक्त सन २००३–०४या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरु असलेल्या तसेच~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर~~ / ~~कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.~~ ~~नवीन~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४. | ५. |
| १] | हरदेवबाबा शिक्षण संस्था, सर्वे नं. ४५/१/इंद्रा- ~~यणी नगर, भोसरी.~~ | प्रियदर्शनी प्रायमरी स्कूल, इंद्रायणी नगर, भोसरी | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक [illegible], व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा [illegible] चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

12/06/2025, 11:59

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच गतीशीलता, नियमितता आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआ ६द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका ांकडे परवानगी दिले ा शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा. असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

स्थळ प्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. मा. सचिव/अध्यक्ष,
हरदेवबाबा शिक्षण संस्था, सर्वे नं. ४५/१ इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे-२६.

12/06/2025, 11:59

३ ४

४८०११८३

**कायम विना अनुदान**

जा.क्र. माध्य.३(१४)/नमाशा/मान्यता/पुणे/२००४/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : - 6 MAR 2004

प्रति,

सचिव,
हरदेवसिंह बाबा एज्युकेशन सोसायटी,
इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे.....

विषय : सन २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत . . .

संदर्भ : १)शासन पत्र क्रमांक : नमाशा २००३( ७८४/०२ ) माशि-१. दि. २/१२/२००३
२)शि.अ.(मा.)जि.प.पुणे यांचे प.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/१४२/०४/१२४, दि. २/२/०४

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेस, नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून .२००३ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे..

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | हरदेवसिंह बाबा एज्युकेशन सोसायटी, इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे. | इंद्रायणी नगर, भोसरी पुणे. | आठवी | इंग्रजी. |

## कायम विना अनुदान

१ आपल्या संस्थेची वरती नमूद केलेल्या नवीन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३ "कायम विना अनुदान तत्वावर मिळालेली शाळा" असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा पध्दतीने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे .

४. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकारी यांचेशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे

५. सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदर संस्थाची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

७. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

८. जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राध्यान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये

१०. माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

११ संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

१२. शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करुन देण्यात येईल.

१३ माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

१४. शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१५. माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यबळ गट समिती सभेच्या पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही

१६. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

..२..



12/06/2025, 11:59

इतर अटी -

१. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.
२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. सदर संस्थामार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३, ३ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थाना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

सही/- शिक्षण उपसंचालक
यांनी स्वाक्षरी आहे.

प्रतिलिपी -

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे. यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांना वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा, तसेच संस्थाविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराचे उतारणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१. मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना सविनय सादर
३. निवडनस्ती

12/06/2025, 11:59

तात्काळ 8

**कायम विना अनुदान**

२०६५७/५४

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००२-०३

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१, यांचे कार्यालय.

दिनांक 19 DEC 2003

प्रति,

सचिव

हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी,

इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे

विषय :- २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- १. शासन पत्र क्रमांक नमाशा/१००३ /(७८४/२००३)/माशि-१ दिनांक २.१२.२००३

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक अमाशा/१०२ के/नमाशा/६५१७०/१५-क, दिनांक २८.९.२०००

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे | इंद्रायणीनगर, भोसरी, जि. पुणे | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. अ) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकालात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.

१ ब) या नवीन माध्यमिक शाळांना शासनाने कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असुन भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत दण्यात येणार नाही.

२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे..

३ आपल्या संस्थेची आथिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु २०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावे.

५. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे अगर केवळ मुंबई सार्वजनीक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

६. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

७. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

८. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबीत नाही.

९. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते ८ विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
आपण संबंधित संस्थेची अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

प्रत : २. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर

३. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना सविनय सादर

12/06/2025, 11:52

क्र. शिशाप्र/शाप्रशा/3/का वि/८७५ /०३.

8

२३४४८/०६

आ.क्र. माध्य.३(१४)/नमाशा/पुवि/२००४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :

2 APR 2004

प्रति,

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय : इयत्ता ९ वी १० वी च्या वर्गास मान्यता

संदर्भ : १) शासन पत्र क्रमांक : नमाशा १००३ /(७८४ /२००३) माशि-१. दि. २-१२-२००३
२) शासन पत्र क्रमांक : नमाशा १००३ /(९०० /२००३) माशि-१. दि. १८-१२-२००३

उपरोक्त विषयाचे या कार्यालयास उददेशून लिहिलेले व आपणास पृष्ठांकित केलेले संदर्भाधिन पत्र कृपया पहावीत..

शासन पत्र क्रमांक : नमाशा १००३ /(७८४/२००३) माशि-१. दि. २/१२/०३ अन्वये हरदेवसिंगबाबा एज्युकेशन सोसा., इंद्रायणीनगर, भोसरी, जि. पुणे......या संस्थेच्या इंग्रजी.....माध्यमाच्या माध्यमिक शाळेस इयत्ता आठवीच्या वर्गास इंद्रायणीनगर, भोसरी, जि. पुणे................ येथे सन २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य -३/(१४).नमाशा/मान्यता/पुवि/५८७१/८३/२००४....दिनांक ६-३-२००४ अन्वये संबंधित संस्थेस नवीन माध्यमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर जुन २००३ पासून सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

सदर संस्था उक्त शाळेत इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग सुरु करु इच्छित असल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेवून या संस्थेस इयत्ता ८ वी वर्गाबरच इयत्ता ९ वी व १० वी चे वर्गास विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून सुरु करण्यास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांनी स्वाक्षरी केली आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत - माहिती व कार्यवाहीस्तव रवाना.
सचिव, हरदेवसिंगबाबा एज्युकेशन सोसायटी,
इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
मा. शिक्षण संचालक, ( माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १

12/06/2025, 12:02

8


# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com


जा.क.शिउसं/उमाशि-१/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९/5362

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 22. 7. 2019.

प्रथम मान्यता २०१८-२०१९

माध्यम : इंग्रजी

स्वंयअर्थ सहाय्यित शाळा

प्रति

प्राचार्य

प्रियदर्शनी हायस्कूल इंद्रायणीनगर भोसरी पुणे

**विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शा[illegible] ([illegible] व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी [illegible] मान्यता देण्याबाबत....**

**संदर्भ** :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम [illegible] राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६ [illegible] दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन पत्र एसएफएस-१०१८/प्र.क्र.३५६/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-२ दि.२३.०४.२०१८

४. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र दि .०८ .०५ . २०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत संदर्भ कमांक-२ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे.त्या प्रस्तावानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार खालील अटी व शतीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे .

| शासन पत्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी भोसरी पुणे | प्रियदर्शनी हायस्कूल इंद्रायणीनगर भोसरी पुणे | इंग्रजी | दर्जावाढ उच्च माध्यमिक शाळा राज्यमंडळ | उच्च माध्यमिक विज्ञान इ.११ वी स्वयंअर्थसहाय्यित | २०१८-१९ |

अटी व शर्ती :-

१. ज्या व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासुन अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.

२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी

३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी

४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी

५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही

७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद समजण्यात येईल

८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून असेल.

९ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी उच्च माध्यमिक नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

12/06/2025, 11:51

११ महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही

१२ महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-Dise मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१३ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील

१४ सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

**इतर अटी :-**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.
शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१ **मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२**
२ **मा. आयुक्त,शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे- १**
३ **मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**

१ **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.**

12/06/2025, 11:51

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०१/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८/ 8264

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- - 9 JUL 2018

प्रति

अध्यक्ष/सचिव,

हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी,भोसरी,पुणे .

विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय क्रं. एसएफएस-१०१८/प्र.क्र.३५६/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि २३.०४.२०१८

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी (इरादापत्र) दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी,भोसरी,पुणे | प्रियदर्शनी हायस्कूल इंद्रायणीनगर भोसरी,पुणे | इंग्रजी | दर्जावाढ शाळा राज्यमंडळ | उच्च माध्यमिक इ.११ वी ते १२ वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित | २०१८-१९ |

अटी व शर्ती :-

१. उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५ परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

६ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

७ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

८ यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

MRaut

(मिनाक्षी राऊत)

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

12/06/2025, 11:52

8

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जा . क . शिउस/उमाशि/पुवि/स्वअशामा/निवाढ/२०१९/ ५५२० दिनांक :- 31 JUL 2019

प्रति,
प्राचार्य,
प्रियदर्शनी हायस्कूल इद्रायणीनगर भोसरी पुणे .

**विषय :- सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत इ.१२ वी विज्ञान वर्गास नैसर्गिक वाढीने परवानगी देण्याबाबत**

संदर्भ :- शिक्षणाधिकारी माध्यमिक जि . प . पुणे यांचा वार्षिक [illegible] अहवाल दि . ०८ . ०५ . २०१९

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता . त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करण्याकरिता सन २०१८-१९ मध्ये परवानगी मिळाली होती त्यास अनुसरून या कार्यालयाकडून प्रथम मान्यता देण्यात आली होती त्या अनुषंगाने सन २०१९-२० मध्ये इ . १२ वीच्या **विज्ञान** शाखेच्या वर्गास नैसर्गिक वाढीने परवानगी देण्यात येत आहे .

| शा नि अनु . | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार | मान्यता वर्ग इ . १२ वी | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | **हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी भोसरी पुणे** | **प्रियदर्शनी हायस्कूल इद्रायणीनगर भोसरी पुणे** | इंग्रजी | स्वयंअर्थ सहाय्यित दर्जावाढ उच्च माध्यमिक शाळा राज्यमंडळ | विज्ञान प्रथम | २०१९-२०२० |

(मिनाक्षी राऊत)
प्र . शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-०१ .

**प्रत माहितीसाठी :-**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे .

12/06/2025, 11:51